नियमीत दिवाणी दावा क्र.१८/२०२५
(पासगोंडा विरुध्द सुभाष)
(CNR No.MHSN120001442025)

**<u>निशाणी क्र.१९ खालील आदेश</u>**
**(दिनांक २६.११.२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी त्यांचे विरोधात झालेला विना लेखी कैफियत/म्हणणेचा आदेश दुर सारणेकरिता दाखल केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतकामी दि.२०.०६.२०२५ व ०४.०८.२०२५ रोजी तारीख न्यायालयात नेमण्यात आली होती, सबब प्रतिवादी यांना तोंडाचा कॅन्सर झाला असून त्यांचेवर वेळझेवेळी औषधोपचार चालु होते व अलीकडेच त्यांना जास्त त्रास होवू लागल्याने त्यांची वैद्यकीय तपासणी केली असता त्यांचा आजार पुन्हा बळावला असल्याचे समजून आल्याने पुन्हा दि.१८.०७.२०२५ रोजी ऑपरेशन झाले व दि.२३.०७.२०२५ रोजी डिसचार्ज दिला असून तीन महिन्यांची बेडरेस्टची गरज असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते त्यामुळे त्यांना माहितगार वकीलांमार्फत मागील तारखेस अलाहिदा अर्ज दाखल करुन म्हणणे दाखल करणेस मुदत मागितली व त्याकामी आवश्यक असणा-या कागदपत्रांची वेळेत पुर्तता करता आली नसल्याने त्यांना मुदतीत कैफियत /म्हणणे देता आले नाही. सदर कामी प्रतिवादी यांनी कैफियत/म्हणणे दाखल करणेस जाणूनबुजून विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांना त्यांची कैफियत देणेची संधी न मिळाल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी लेखी कैफियत व म्हणणे दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द विना कैफियत/ म्हणणे असा आदेश झालेला आहे तो आदेश रद्द करणेत यावा व प्रस्तुतच्या अर्जासोबतची कैफियत/म्हणणे याकामी दाखल करुन घेणेत यावी अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादी यांनी नि.क्र.२१ प्रमाणे त्यांचे म्हणणे देवून अर्जातील कथने त्यांना मान्य नाही, प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आलेस जास्तीत जास्त रक्कमेचा दंड मंजूर करण्यात यावा असे सांगितले आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे, दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द कायम व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचा दि.१८.०७.२०२५ रोजी ऑपरेशन झाले व दि.२३.०७.२०२५ रोजी डिसचार्ज दिला असून तीन महिन्यांची बेडरेस्टची गरज असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यामुळे त्यांना माहितगार वकीलांमार्फत मागील तारखेस अर्ज दाखल करुन म्हणणे दाखल करता आली नसल्याने त्यांना मुदतीत लेखी कैफियत /म्हणणे देता आले नाही. त्यामुळे विना कैफियत/म्हणणे असा आदेश पारीत करुन प्रकरण प्रतिवादीचा विना लेखी कैफियतचा आदेश पारीत करण्यात आला. अर्जातील नमुद कारणे संयुक्तिक नसले तरीही प्रतिवादीस प्रस्तुत प्रकरणात त्यांची लेखी कैफियत/म्हणणे पटलावर सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी यांचा निशाणी क्र.१९ कडील अर्ज र.रु.३००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे व त्यांचेविरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश दुर सारणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावे.

३. दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

sd/-

पलूस.

दिनांक- २६.११.२०२५

(एम.ए.एम.जे. शेख)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पलूस.